## <u>परिशिष्ट ‘अे’</u>

**भूमिहीन शेतमजूर असल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना**

( हे प्रमाणपत्र नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ दर्जाच्या अधिका-याच्या स्वाक्षरीचे नसावे)

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती ........................................... (विद्यार्थ्याच्या वडीलांचे / आईचे नांव) राहणार.......................... तालुका............................ जि. .............................. हे ...................................................... (विद्यार्थ्यांचे नांव) यांचे वडील/आई असून त्यांच्या नांवे कोणतीही शेतजमीन नाही. त्यांचे मुख्य उत्पन्नाचे साधन हे .......................................... (शेत मालकाचे नांव) राहणार.................... तालुका...................... जि. .................. यांच्या शेतामधील दैनंदिन मजुरी हेच आहे.

ठिकाण - स्वाक्षरी
दिनांक - नांव
कार्यालयीन मोहर पदनाम

...........................................................................................................................................

टीप- हे प्रमाणपत्र प्रवेश घेणा-या विद्यार्थ्याच्या नावे नसावे.

---

## <u>परिशिष्ट ‘बी’</u>

**शेतकरी असल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना**

( हे प्रमाणपत्र नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ अधिका-याच्या स्वाक्षरीचे नसावे)

प्रमाणित करण्यात येते की, श्री. /श्रीमती.................................................................... (जमीन धारकाचे नांव) राहणार................ तालुका................. जि. ....................... हे श्री./कु. ........................................................... (विद्यार्थ्याचे नाव) यांचे/हिचे वडील/ आई /आजोबा /आजी (वडिलांकडून) असून श्री/श्रीमती................................................. यांच्या नांवे ............ हे. ...........आर इतकी शेतजमीन आहे. ही जमीन ......................................... अधिनियम,* १९............ चे कलम ............ मधील तरतुदीनुसार कमाल धारणेपेक्षा अधिक नाही. असेही प्रमाणित करण्यात येते की, त्यांचे उत्पन्नांचे मुख्य साधन त्यांच्या नांवे असलेल्या शेतजमिनीतून आहे.

ठिकाण - स्वाक्षरी
दिनांक - नांव
कार्यालयीन मोहर पदनाम

...........................................................................................................................................

**टीप**
(१) * येथे संबंधित अधिनियमाचे पूर्ण नाव द्यावे.
(२) स्वाक्षरी व कार्यालयीन मोहर ही अधिकृत अधिका-याचीच असावी.
(३) ‘शेतकरी’ म्हणजे अशी व्यक्ती की, जिच्या नावे असलेली शेतजमीन संबंधित महसुली विभागाच्या जमीन अधिनियमानुसार कमाल धारणेपेक्षा अधिक नाही.
(४) विद्यार्थी स्वतः जमीन मालक असल्यास जमीनधारकाचे नांव त्याचेच राहील.

## परिशिष्ट ‘सी’

## ‘मूळ प्रतींविषयी स्वयं घोषणापत्र’

अर्जदाराचा फोटो

मी ....................................... श्री. ................................ यांचा मुलगा / मुलगी वय ........... वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) .............. व्यवसाय ................ राहणार ................. याद्वारे घोषित करतो / करते की, मी संकेतस्थळावर अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती खऱ्या आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :- ...............  अर्जदाराची सही ......................

दिनांक :- ...............  अर्जदाराचे नावः.......................

<u>परिशिष्ट 'डी'</u>

## जागेवर प्रवेश फेरीची (Spot Admission) कार्यपध्दती

जागेवरील प्रवेश फेरीपूर्वी राबविण्यात आलेल्या प्रवेश फे-यांद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने जागा रिक्त असल्यास अशा रिक्त जागांसाठी दि. ०३ ते ०५ सप्टेंबर,२०१८ या कालावधीत जागेवरील प्रवेश प्रक्रिया केद्रांवर (**Spot Admission Process Center**) खालील कार्यपध्दतीने जागेवर प्रवेश फेरी (**Spot Admission Round**) राबविण्यात येईल.

यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रत्येक प्रवेश फेरीतील अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्गनिहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील संकेतस्थळावर ०१ सप्टेंबर,२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार जागेवर प्रवेश फेरीकरिता पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) जागेवरील प्रवेश फेरी फक्त 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'वर राबविण्यात येईल. कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील विद्यालयांच्या ठिकाणी जागेवरील प्रवेश फेरी राबविण्यात येणार नाही. 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'वर ज्या ज्या विद्यालयांची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, त्याबाबतचा प्रवेश प्रक्रिया केंद्रनिहाय तपशील **परिशिष्ट "ई"** मध्ये देण्यात आला आहे.

(२) संकेतस्थळावरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन उमेदवारांना ज्या विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या विद्यालयाशी संबंधित 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'वर दि.०३ ते ०५ सप्टेंबर,२०१८ **या कालावधीत सकाळी ९.०० ते ११.३० वाजेपर्यंत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित राहावे.

(३) प्रवेश प्रक्रिया केंद्राच्या प्रमुखांनी उपस्थित असलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करावी. प्रत्येक दिवसाची स्वतंत्र गुणवत्ता यादी असेल. ही गुणवत्ता यादी फक्त त्याच दिवसासाठी ग्राह्य असेल.

(४) वरीलप्रमाणे पात्र उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करून रिक्त जागांसाठी प्रवेश देण्यात यावेत. **आरक्षित प्रवर्गातील रिक्त जागांसाठी संबंधित प्रवर्गाच्या उमेदवारांनाच प्राधान्यक्रमाने प्रवेश देण्यात यावेत.** संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील प्रवेश कार्यपध्दतीनुसार अशा रिक्त जागांवर 'जागेवर प्रवेश फेरीच्या' (Spot Admission Round) शेवटच्या दोन दिवशी म्हणजेच दि.०५ सप्टेंबर,२०१८ **रोजी** उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात यावेत. सदर शासन निर्णय संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. **मात्र कोणत्याही परिस्थितीत आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला नाही, अशी तक्रार आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवारांकडून कोणत्याही परिस्थितीत येणार नाही, याची दक्षता संबंधित 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'नी घ्यावी.**

(५) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे **मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे ('केटीपीएल'-KTPL) यांच्या संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे** 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'नी **संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** यासाठी संकेतस्थळावर 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'च्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी 'केटीपीएल' यांची असेल.

(६) दि. ०३ ते ०५ सप्टेंबर,२०१८ या कालावधीत दररोज सायंकाळी ५.३० पर्यंत वरील प्रवेश प्रक्रिया संबंधित 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'वर करण्यात यावी.

(७) जागेवर प्रवेश फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारास संबंधित 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'कडून तात्पुरते 'प्रवेश वाटप पत्र' देण्यात येईल.

(८) 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'शी संबंधित असलेल्या प्रत्येक विद्यालयाच्या एका प्रतिनिधीने संबंधित 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'त जागेवरील प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उपस्थित रहावे. या प्रतिनिधीने त्यांच्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची आवश्यक ती कागदपत्रे व नियमानुसार प्रथम सत्राच्या शुल्काची रक्कम प्राप्त करून घ्यावी. याबाबत उमेदवारास पावती द्यावी.

(९) जागेवरील प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उमेदवाराने प्रवेश रद्द केला असल्यास किंवा इतर कारणामुळे प्रवेश रद्द केल्यास, यामुळे रिक्त झालेली जागा त्याच दिवशी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, मात्र त्याच दिवशी भरण्यात येऊ नये. अशी रिक्त जागा दुस-या दिवसापासून प्रवेशाकरिता उपलब्ध करून देण्यात यावी. (जागेवरील प्रवेश फेरीच्या शेवटच्या दिवशी रिक्त होणा-या जागांसंदर्भात ही बाब लागू नसेल.)

## परिशिष्ट ‘ई’

## जागेवरील प्रवेश फेरीसाठी प्रवेश प्रक्रिया केंद्रे व केंद्रांशी संबंधित विद्यालयांचा तपशील

| अ. क्र. | प्रवेश प्रक्रिया केंद्राचे नाव | प्रवेश प्रक्रिया केंद्रांतर्गत विद्यालये |
|---|---|---|
| १. | कृषी तंत्र विद्यालय, जळगाव | जळगाव जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| २. | कृषी तंत्र विद्यालय, धुळे | धुळे, नंदूरबार जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| ३. | कृषी तंत्र विद्यालय, पुणतांबा, ता.राहाता. जि. अहमदनगर | अहमदनगर जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| ४. | कृषी तंत्र विद्यालय, मांजरी,फार्म ता.हवेली, जि. पुणे | पुणे जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| ५. | कृषी तंत्र विद्यालय, सोलापूर | सोलापूर जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| ६. | कृषी तंत्र विद्यालय, बोरगांव जि.सातारा | सातारा जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| ७. | कृषी तंत्र विद्यालय, डिग्रज ता. मिरज, जि.सांगली | सांगली जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| ८. | कृषी तंत्र विद्यालय, कोल्हापूर | कोल्हापूर जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| ९. | कृषी तंत्र विद्यालय, मालेगांव, जि.नाशिक (अनुदानित) | नाशिक जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| १०. | कृषी तंत्र विद्यालय, निंबी (मालोकार) ता. अकोला, जि. अकोला | अकोला, वाशिम जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| ११. | कृषी तंत्र विद्यालय, बुलडाणा, जि. बुलडाणा | बुलडाणा जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| १२. | कृषी तंत्र विद्यालय, सेलसुरा, ता. देवळी, जि. वर्धा | वर्धा जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| १३. | कृषी तंत्र विद्यालय, सावंगी, ता. कमळेश्वर जि. नागपूर | नागपूर, भंडारा जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| १४. | कृषी तंत्र विद्यालय, हिवरा, पोष्ट रतनारा, ता. गोंदीया जि. गोंदीया | गोंदिया जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| १५. | कृषी तंत्र विद्यालय, मुल, जि. चंद्रपूर | चंदपूर, गडचिरोली जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| १६. | कृषी तंत्र विद्यालय, वरुड (पुसद), पोष्ट. मोहा, ता. पुसद, जि. यवतमाळ | यवतमाळ जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| १७. | कृषी तंत्र विद्यालय, धारणी मोजे. कुसुमकोट (खुर्द) पोष्ट. - धारणी ता.जि. अमरावती | अमरावती जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |

| अ. क्र. | प्रवेश प्रक्रिया केंद्राचे नाव | प्रवेश प्रक्रिया केंद्रांतर्गत विद्यालये |
|---|---|---|
| १८. | कृषी तंत्र विद्यालय, वनामकृवि परिसर, परभणी | परभणी जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| १९. | कृषी तंत्र विद्यालय, गणेश नगर, पावडेवाडी नाक्या जवळ, नांदेड | नांदेड जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| २०. | कृषी तंत्र विद्यालय, पैठण रोड, औरंगाबाद | औरंगाबाद जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| २१. | कृषी तंत्र विद्यालय, अंबाजागोई, जि.बीड | बीड जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| २२. | कृषी तंत्र विद्यालय, नांदेड रोड, लातूर | लातूर जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| २३. | कृषी तंत्र विद्यालय, कृषी संशोधन केंद्र तुळजापूर जि. उस्मानाबाद | उस्मानाबाद जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| २४. | कृषी तंत्र विद्यालय, देऊळगाव राजा रोड, जालना | जालना जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| २५. | कृषी तंत्र विद्यालय, उस संशोधन केंद्र वसमतनगर जि. हिंगोली | हिंगोली जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| २६. | कृषी तंत्र विद्यालय, रोहा, जि. रायगड (घटक) | रायगड जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| २७. | कृषी तंत्र विद्यालय, लांजा, जि.रत्नागिरी (घटक) | रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| २८. | कृषी तंत्र विद्यालय, कोसबाडहिल, ता.डहाणू जि. पालघर (संलग्न) | ठाणे जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| २९. | महात्मा गांधी आदिवासी जनता कृषी तंत्र विद्यालय, कोसबाडहिल, ता.डहाणू जि.पालघर (संलग्न) | पालघर जिल्हयातील सर्व कृषी विद्यालये |
| ३०. | मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम विद्यालय, शिरगांव जि.रत्नागिरी | मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम विद्यालय, शिरगांव जि.रत्नागिरी |